## अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०१ ची साक्ष

## निशाणी क्र. ०७ लगत

**मी याव्दारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

नाव – कृष्णा जगन माळवे,

वय – २८ वर्षे,

व्यवसाय – हातमजुरी,

राहणार – गोविंद नगर, दोंडाईचा, ता. शिंदखेडा, जि. धुळे.

**सरतपास शपथेवर अभियोगपक्षातर्फे सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्री. जे.एस.गंगावणे यांचे मार्फत.**

०१. दिनांक २३.१२.२०२३ रोजी मला पोलीसांनी पंचनाम्याकरीता दोंडाईचा पोलीस स्टेशन येथे बोलाविले होते. पोलीस स्टेशन येथे जावुन मी एका कागदावर सही केली होती. (आता साक्षीदारास प्रस्तुत खटल्यातील घटनास्थळ–नि–जप्ती पंचनामा दाखविण्यात आला.) त्याच्यावर अ. क्र. २ कडील सही माझी आहे. पंचनाम्यातील मजकुराबाबत मला माहिती नाही. (करिता घटनास्थळ–नि–जप्ती पंचनाम्यावरील सहीस **नि. क्र. ०७** देण्यात येते.) माझ्यासमोर पोलीसांनी कोणतीही वस्तु जप्त केली असे घडले नाही. मी आरोपीला ओळखत नाही.

(सदर साक्षीदार अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्वान सहा. सरकारी अभियोक्ता यांनी साक्षीदारास उलटतपासास्वरुप प्रश्न विचारण्याची अनुमती मागीतली. तशी अनुमती देण्यात येते.)

०२. हे म्हणणे खरे नाही की, दि. २३.१२.२०२३ रोजी मी दोंडाईचा पोलीसांसोबत गोंविद नगर येथे एका घराच्या आडोश्याला सार्वजनीक जागी पंचनाम्याकरीता गेलो होतो. हे म्हणणे खरे नाही की, घटनास्थळी एक इसम तीन प्लॅस्टीकचा कॅन घेवुन खाली बसलेला

दिसुन आला. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष १८.४० वाजता तेथे छापा टाकला व पिंटु भावराव भिल याला जागीच पकडले. हे म्हणणे खरे नाही की, त्याच्या कब्ज्यात तीन प्लॅस्टीकच्या कॅनमध्ये २० लिटर गावठी हातभट्टीची दारु मिळुन आली. हे म्हणणे खरे नाही की, माझ्यासमक्ष पोलीसांनी जप्त मुद्देमालातुन १८० मि.ली. मापाच्या काचेच्या बाटलीमध्ये दारु काढुन घेतली व सदर बाटलीवर पंचांच्या व पोलीसांच्या सहयांचे लेबल लावले. मी स्वत:हुन सांगतो की, मी केवळ सही केली होती. हे म्हणणे खरे नाही की, उर्वरित मुद्देमाल जागीच नाश केले. हे म्हणणे खरे नाही की, पोलीसांनी माझ्यासमक्ष जागीच दिसत्या वस्तुस्थितीप्रमाणे घटनास्थळ–नि–जप्ती पंचनामा तयार केला होता व तो वाचुन पाहुन बरोबर असल्याने मी त्याच्या सही केल होती. हे म्हणणे खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**उलटतपास आरोपीतर्फे विधीज्ञ श्री. एस. बी.भोई यांचे मार्फत.**

**उलटतपास नाकारला.**
**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृत,

ADITYA GHANSHAM NAIK
Digitally signed by ADITYA GHANSHAM NAIK
Date: 2026.02.24 11:23:30 +0530

दिनांक : २३/०२/२०२६
स्थळ : दोंडाईचा

(आदित्य घ. नाईक)
प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, दोंडाईचा

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी प्रमाणित करितो की, सदर पी.डी.एफ. संचिकेतील मजकूर हा स्वाक्षरीत करण्यात आलेल्या मूळ  न्यायनिर्णय/ आदेशाप्रमाणे खरा व बरोबर आहे.

लघुलेखकाचे नांव - गणेश साईनाथ अहिरे,

न्यायालयाचे नांव - न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, दोंडाईचा.

पीडीएफ फाईल अपलोड केल्याचा दिनांक. - २४.०२.२०२६.

स्वाक्षरित/-
लघुलेखक (श्रेणी-३)